# ६. न्यायमदळाची भूमिका


**प्र.१ अ ) दिलेल्या प्रतयांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा:**
1) न्यामंडळाच्या स्वातंत्र्यासाठी संविधानात स्पष्ट तरतुदी करणाता पहिला देश **<u>अमेरिका</u>** आहे.
२) न्यायमंडळाचे प्राथमिक कार्य **<u>अभिनिर्णय</u>** आहे.

**ब ) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा :**
१) लिखित राज्यघटना – भारत
2) न्यायलाईन पुंनर्विलोकण – यूनाईतेड किंग्डम
3) स्वातंत्र्य न्यायमंडल – अमेरिका
उत्तर : दुरुस्त जोडी :
**<u>न्यायलाईन पुंनर्विलोकण – अमेरिका</u>**

**क) दिलेल्या विधांनांसाठी समर्पक संकल्पना लिहा :**
१) सारवाजलीकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयाच्या संदर्भात दाखल केलेली याचिका. .
**<u>उत्तर : जनहित याचिका</u>**

२) न्यायाधीशांना बडतर्फ करण्याची प्रक्रिया.
उत्तर : **महाभियोग**
३) विशिष्ट बाबींशी निगडीत खटले विशिष्ट न्यायालयात दाखल करता येण्याचे अधिकारक्षेत्र .
उत्तर : **मूळ अधिकारिता**

**प्र.२ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा**
उत्तर :



प्र.३ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा

(१) अमेरिकेत न्यायाधीशांच्या नेमणुकीला सिनेटच्या संमतीची गरज नसते.
उत्तर : हे विधान चूक आहे.
कारण : अमेरिकेच्या अध्यक्षाने पाठवलेले न्यायाधीशांच्या नेमणुकीच्या प्रस्तावना सिनेटची संमती आवश्यक असते.

(२) भारतात न्यायमंडळ स्वतंत्र आहे.
उत्तर : हे विधान बरोबर आहे.
कारण : भारताच्या संविधानात न्यायमंडळाच्या स्वातंत्र्याच्या रक्षणाकरिता आवश्यक असणाऱ्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

प्र. ७ सहसंबंध स्पष्ट करा :
(१) न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळ.
उत्तर : (१) मध्ययुगाच्या अखेरपर्यंत अनियंत्रित राजसत्ता जगातील सर्व देशांत अस्तित्वात होती. साहजिकच न्यायमंडळ राजाच्या आज्ञेप्रमाणे न्यायदान करीत असत.
(२) लोकशाही शासनप्रणाली
उदय झाल्यानंतर सत्ताविभागणीच्या तत्त्वानुसार कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांची फारकत करण्यात आली आहे.
(३) नियंत्रण आणि समतोलाच्या तत्त्वानुसार न्यायाधीशांची नेमणूक कार्यकारी मंडळ - राष्ट्रप्रमुखाद्वारा करण्यात येते.
(४) शासनाच्या कार्यकारी मंडळाच्या कृती/निर्णय संविधानाशी विसंगत असेल, तर त्यांना बेकायदेशीर घोषित करण्याचा अधिकार न्यायालयास असतो.

*(२) सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय.
उत्तर : (१) भारताच्या एकेरी न्यायव्यवस्थेच्या शिखरस्थानी सर्वोच्च न्यायालय आणि मध्य स्तरावर उच्च न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.
(२) उच्च न्यायालयात न्यायाधीशपदाचा ५ वर्षांचा अनुभव असलेले न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश होण्यास पात्र असतात.
(३) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश मंडळ उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक, बदली व पदोन्नतीसंबंधीच्या शिफारशी राष्ट्रपतीस करतात.
(४) उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध फेरविचारणी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करता येते. या याचिकेची सुनावणी करताना उच्च न्यायालयाच्या निकालात बदल करण्याचा/ते रद्द करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास असतो.

**प्र. ५ आपले मत नोतदवा.**
**१) न्यायमंडळाची न्यायाधीशांच्या नेमणूक प्रक्रियेत भूमिका**

**महत्त्वाची असणे आवश्यक आहे.**
**उत्तर :** (१) न्यायाधीशांच्या नेमणूक प्रक्रियेत न्यायमंडळाची भूमिका महत्त्वाची असणे गरजेचे आहे.
(२) न्यायमंडळाला या प्रक्रियेत स्थान नसेल तर कार्यकारी मंडळ आपल्या मर्जीतील न्यायाधीशांच्या नेमणुका करू शकेल.
(३) न्यायमंडळाला या प्रक्रियेत स्थान नसेल तर कार्यकारी मंडळ न्यायाधीशांच्या नेमणुकीविषयीचे प्रस्थापित संकेत पायदळी तुडवू शकेल.
(४) न्यायमंडळाला या प्रक्रियेत स्थान नसेल तर न्यायमंडळाचे स्वातंत्र्य लोप पावेल.
(५) १९९३ साली भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीश मंडळाच्या (Collegium) शिफारशीनुसारच सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांतील न्यायाधीशांच्या नेमणुका करण्यात यावा असा आदेश भारत सरकारला दिला होता. त्यानंतर न्यायाधीश नेमणूक
प्रक्रियेत कार्यकारी मंडळाचा हस्तक्षेप कमी होत गेला होता.

**(२) आमच्या काळात न्यायालयीन सक्रियता महत्त्वाची आहे. आपले मत नोंदवा.**
**उत्तर :** (१) भारतातील न्यायदानाची प्रक्रिया क्लिष्ट आणि खर्चीक असल्याने सर्वसामान्य लोकांना ती परवडत नाही, असे प्रतिपादन न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्णा यांनी १९७९ साली केले होते. सर्वसामान्य लोकांना न्याय मिळावा या उद्देशाने न्यायमूर्ती भगवती व चंद्रचूड यांनी न्यायालयीन सक्रियतेचा अवलंब केला.
(२) न्यायालयीन सक्रियतेने म्हणजे नागरिकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी न्यायालयाने पुढाकार घेणे. त्यासाठी न्यायालय जनहितार्थ याचिका दाखल करून घेतात. न्यायालये शासकीय धोरणांची चिकित्सा करतात आणि त्याबाबतचे निर्देश शासनास देतात.
(३) पूर्वी न्यायालये फक्त त्यांच्यासमोर आलेल्या याचिका विचारात घेत असत. १९८० च्या दशकात टपालाद्वारा पाठवण्यात आलेल्या तक्रारी ती विचारात घेत असत. अलीकडे वर्तमानपत्रांतील बातम्यांच्या आधारे न्यायालये हस्तक्षेप करू लागली आहेत.
(४) न्यायालयीन सक्रियतेमुळे संविधानाने प्रस्थापित केलेले सत्तेचे संतुलन बिघडले आहे, असा आक्षेप घेण्यात येतो. त्यांच्या मते, ज्या बाबी विधिमंडळ व कार्यकारी मंडळाच्या अखत्यारीत आहेत, त्यात न्यायमंडळ हस्तक्षेप करते.
(५) वरील आक्षेपात जरी तथ्य असले तरी निष्क्रिय शासनाला आपल्या जबाबदारीची/कर्तव्यांची जाणीव करून देण्याचे कार्य न्यायालयांनी केले आहे. सर्वसामान्यांवरील अन्यायाचे परिमार्जन, पर्यावरणाचे संरक्षण आणि दुर्बल घटकांच्या हक्कांची जोपासना या न्यायालयीन सक्रियतेच्या उल्लेखनीय बाबी आहेत. म्हणून मी न्यायालयीन सक्रियतेचे समर्थन करतो.

**प्र. ६) दिलेल्या मुद्दयांच्या आधारे पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

**(१) न्यायालयीन पुनर्विलोकनाची प्रक्रिया स्पष्ट करा :**
**[मुद्दे : (व) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अर्थ**
**(ब) न्यायालयीन पुनर्विलोकनाची आवश्यकता (क) न्यायालयीन**
**पुनर्विलोकनाची सुरुवात कोठे व कशी झाली? (ड) भारताच्या**
**संदर्भात न्यायालयीन पुनर्विलोकन]**
**उत्तर : (अ) न्यायालयीन पुनर्विलोकन चा अर्थ :** न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे संसदेने पारीत केलेले

कायदे संविधानाशी सुसंगत आहेत किंवा नाहीत याची पडताळणी करणे आणि जर कायदे संविधानाशी सुसंगत नसतील तर ते घटनाबाह्य घोषित करण्याचा न्यायालयाचा अधिकार.

**(ब) न्यायालयीन पुनर्विलोकनाची आवश्यकता :**

(१) लोकशाही शासनप्रणाली असलेल्या देशांनी संविधानवादाचा स्वीकार केला आहे. त्यानुसार संविधान देशाचा सर्वोच्च कायदा समजला जातो आणि त्यानुसार राज्यकारभार करण्यात यावा असे अपेक्षित असते.

(२) कायदेमंडळास कायदे करण्याचा अधिकार जरी देण्यात आला असला, तरी संविधानात्मक कायदा श्रेष्ठ असल्याने,

कायदे मंडळा द्वारे पारित कायद्याचे दर्जा दुय्यम असतो.

(३) कायदेमंडळाने केलेले कायदे संविधानाशी विसंगत असल्यास लोकशाही, संविधान आणि नागरिकांचे अधिकार संकटात येऊ शकतात.

(४) अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी न्यायालयास न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार भारत व अमेरिका सारख्या देशात देण्यात आला आहे.

**(क) न्यायालयीन पुनर्विलोकनाची सुरुवात कोठे व कशी झाली? :** न्यायालयीन पुनर्विलोकनाची सुरुवात सन १८०३ मध्ये मारबरी विरुद्ध मॅडिसन या वादाच्या निमित्ताने झाली. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश जॉन मार्शल यांनी आपल्या निकालात न्यायालयीन पुनर्विलोकन प्र स्थापना केली. त्यांनी असे प्रतिपादन केले होते की, "The law is what the judge says it is.

**(ड) भारताच्या संदर्भात न्यायालयीन पुनर्विलोकन :** भारताच्या संविधानातील अनुच्छेद १३ मध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्त्व नमूद करण्यात आले आहे. या अधिकाराचा वापर करून सर्वोच्च न्यायालयाने अनेक कायदे व शासकीय निर्णय घटनाबाह्य म्हणून घोषित केले आहेत. सन १९७३ मध्ये केशवानंद भारती विरुद्ध भारत सरकार या वादात सर्वोच्च न्यायालयाने संविधानाची मूलभूत चौकट हे तत्त्व प्रतिपादले. त्यानुसार संसदेला घटनादुरुस्तीद्वारा संविधानाच्या मूलभूत चौकटीत बदल करता येणार नाहीत. अशा प्रकारे न्यायालयीन पुनर्विलोकन क्या अधिकारी द्वारा सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानाचे तत्त्व जोपासले आहे. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळावर अंकुश प्रस्थापित केला आहे आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकार व भारतीय लोकशाहीची जोपासना केली आहे.